# गोमंतकाची शाक्त-पीठे

## कवळ्याची श्रीशांतादुर्गा

१९६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भु प्रवास
सं. क्र. ५१०





RFFBK-0013664

२२१३१६७

# श्री शांता दुर्गा

“ श्रीशान्ता सुखदा म्हणोनि मनुजा
शान्तेस ध्याईं सदा ॥
शान्तेनें शिव-विष्णुला शमविलें
वारूनि विश्वापदा ॥
शान्तेला नमना करूं विषयही
चिंतूं न शान्तेदुर्गी ॥
शान्तेचा स्तव मी करो मन रमो
शान्तेंत शान्ते ! शर्णी ॥

REFBK-0013664

वा. ल. वझे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथालय समृद्धी योजना
१

किंमत
६२
नये पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३८६७



वोरा अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

सांस्कृतिक प्रकाशन ग्रंथ-माला : ७३

श्री : १०८–२ [ ३–६३ ]

■

© १९६३
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

■

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : १३

■

आवृत्ति दुसरी
१९६३

■

किंमत ६२ नये पैसे

■

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केन्द्रांचीं
ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं
आवरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

■

प्रकाशक :
स. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रायव्हेट लि.करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

■

मुद्रक :
जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८, नारायण, पुणें २

# श्री शांता दुर्गा

लहान मुलेंच आपसांत भांडतात असें नाहीं, तर मोठमोठे देखील साध्या कारणावरून भांडत बसतात, असें दिसतें. कधीं कधीं अशीं हीं भांडणें पूर्वीपासूनच चालत आलेलीं आहेत. देव-राक्षस, आर्य-दस्यु, यांच्या भांडणाच्या कथा आपण ऐकल्या आहेत, वाचल्याहि आहेत. पण देवादेवांतलें भांडण कधीं ऐकलें आहेत ? छे, हो देव कसे आपसांत भांडतील ? पण ही स्कंदपुराणांतील अंबिका खंडामधली कथा पहा.

विष्णु आणि शंकर एकदां एकमेकांवर फार रागावले. ते इतके रागावले कीं त्यांनीं आपापलीं शस्त्रें एकमेकांवर सोडलीं. विष्णूंनीं शंकरांवर सुदर्शन सोडलें तर शंकरांनीं विष्णूंवर आपलें पाशुपत नांवाचें अस्त्र सोडलें. दोन्ही अस्त्रें भयंकर. कोणी कोणास हार जाईनात. पण त्याचा परिणाम जगावर होऊं लागला. महायुद्ध पेटल्यावर मधल्यामधें लहान लहान देश नाहीं का चिरडत ! मोठ्यांचें भांडण आणि छोट्यांचें मरण; असेंच झालें. सुदर्शन-पाशुपताच्या चकमकींतून अग्नीचा डोंब उसळला आणि जग जळूं लागलें.

ब्रह्मदेव बिचारे घाबरले. आतां काय करावें ? त्यांनीं आदि-माया जगदंबेची स्तुति केली. ती प्रसन्न होऊन ब्रह्मदेवांसमोर उभी राहिली. ब्रह्मदेवांनीं विष्णु-शंकरांच्याकडे बोट दाखविलें. आणि ते म्हणाले, “ ते बघ, दोघे कसे आपसांत भांडताहेत ते. ” लगेच



श्रीशांतादुर्गा देवीची मूर्ति

जगदंबा विष्णु-शंकरांच्यामध्यें उभी ठाकली. एका हातानें तिनें विष्णूंना पकडलें आणि दुसऱ्या हातानें शंकरांना धरलें. त्यांची तिनें चांगली कानउघाडणी केली. मग मात्र दोघांनाहि पश्चात्ताप झाला. आपण दोघे देव असून आपसांत भांडत होतों, हें लक्षांत येऊन ते वरमले. मग दोघेहि शांत झाले. आणि जगदंबेला म्हणाले, " दुर्गे, क्रोधानें आम्हांला गांठलें आणि आमच्यांत भांडण लावून दिलें. वेळींच तूं आलीस, नाहींतर काय भयंकर परिणाम झाला असता, कल्पनाहि करवत नाहीं. क्रोधाधीन झालेल्या आम्हांला तूं शांत केलेंस म्हणून तुला लोक आजपासून 'शांतादुर्गा' असें म्हणूं लागतील. "

आदिमाया 'शांतादुर्गा'-रूपानें मूर्त होऊन मग त्याच ठिकाणीं स्थित झाली. आपण पाहिली आहेत ही मूर्ति कधीं? फार दूर नव्हे, आपल्या महाराष्ट्रांतच. हिंदुस्थानाचें नंदनवन काश्मिर. तसेंच गोमंतक हें महाराष्ट्राचें नंदनवन. तिथें जायचें आहे आपल्याला.

## नंदनवनांतील कैवल्यपूर :

गोमंतकांतील कैवल्यपूर म्हणजेच कवळें.


फोंड्याहून तुम्हीं कपिलेश्वराचें मंदिर मागें टाकून निघालांत

कीं, दोन खांब लागतील. त्या रस्त्यानें वळलांत कीं उजव्या बाजूला शेतें, ओढा, नारळीच्या बागा आणि त्या पलीकडील डोंगर अशा सुंदर निसर्गशोभेनें फुललेला प्रदेश दिसेल. आणि डाव्या बाजूनें सुंदर टुमदार घरांची पंक्ति. हेंच तें श्रीशांतादुर्गेचें मंदिर. हा समोरचा रस्ता रामनाथीला गेला आहे आणि हा देवळासमोरचा रस्ता नागेश आणि सौंधेकराच्या राजवाड्यापाशीं गेला आहे.

छोटीशी चढण चढून देवालयाच्या आवारांत आपण येतों. सुरुवातीलाच तलाव. त्यांत छोटेंसें तुळसीवृंदावन. चौघड्याकरितां मात्र कोणी योजकानें ही जागा चांगली शोधून काढली खरी. प्रवेश-द्वारावरच उंच असें चौघड्याकरितां चतुष्कोनी गृह. त्यामुळें चौघ-ड्याचा आवाज साऱ्या डोंगरकपारींतून कसा दुमदुमून राहिला आहे.

आतां आवारांत आलों आपण. किती विस्तीर्ण प्राकार हा. एखाद्या राजवाड्याच्याच आवारांत आल्यासारखें वाटतें. देवा-लयाच्या दोन्ही बाजूंना लांबच्या लांब केवढ्या तरी मोठ्या ह्या इमारती. बिऱ्हाडाची सोय आहे त्यांच्यांत. महाजन मंडळी या इमारतींत रहातात. देवळासमोर हा दीपस्तंभ. देवळाच्या शिखराशीं त्याची स्पर्धा चाललेली दिसते. लहान मुलें जशीं पायांच्या टांचा वर उचलून तूं उंच का मी उंच करतात तशी. देवळामागील डोंगरांची रांग त्यांना जणुं म्हणते आहे, ‘ बाबानो ! तुम्ही दोघेहि सारखेच उंच. मग तर झालें ! ’

आतां देवळांत जायचें आहे ना ? या पायऱ्यांशींच पायतणें काढून ठेवायचीं असतात. ही सुरुवातीलाच चतुष्कोणी मोठी खोली. यावर सुद्धां एक छोटेंसें शिखर आहे. या चतुष्कोणी जागेंत नगारा, भला मोठा आरसा, ह्या तुताऱ्या आणि वाद्यें कशीं व्यवस्थित टापटिपीनें ठेवलीं आहेत. पुढें हें सभागृह. याला इथें ‘चौक’ असें म्हणतात. चौकाच्या पटईवर हंड्या-झुंबरांचें संमेलनच



श्रीशांतादुर्गा-मंदिर . कवळें

भरलें आहे जणुं. केवढ्या पराती नि केवढ्या समया. तेल जमिनी-वर सांडूं नये म्हणून त्याखालीं पराती आहेत. ही समोर मूर्ति दिसते हीच शांतादुर्गेची. श्रीशांतादुर्गेला नमस्कार करा—' जय जगदंब ! '

स्कंदपुराणांतल्या गोष्टीप्रमाणें या मूर्तीनें एका हातांत विष्णूला व दुसऱ्या हातांत शंकराला धरलेलें आहे. नांवासारखीच ही शांत मूर्ति आहे.

परगांवहून आलेले लोक देवीला नारळ ठेवून 'धूळभेट' घेत आहेत. धूळभेट याचा अर्थ पायाला असलेली धूळहि न धुतां सभागृहांतूनच मोठ्या आतुरेनें देवाचें दर्शन घेणें

देवीच्या देवळालगतच डाव्या बाजूनें एक लहानसें मंदिर आहे. त्याच्या मुख्य स्थानीं नारायणदेव आणि नारायणदेवाच्या जवळच विघ्नहर्ता गणपति आहे. आणि दीपस्तंभांच्या जवळच क्षेत्रपाळ अशीं इतर दैवतें. हीं दैवतें बाटाबाटीच्या धामधुमींत कर्दलीपूर ( हलींची केळशी ) या शांतादुर्गेच्या पूर्वस्थानावरून श्रीशांतादुर्गेबरोबरच आलीं आहेत. केळशीपूर्वी ही श्रीशांतादुर्गा

बंगालची. बंगालहून ही केळशीला आणि केळशींतून कवळ्याला कां गेली हें आपल्याला पाहावयाचें असेल तर त्यासाठीं थोडा इतिहास पाहिला पाहिजे.

बंगालहून केळोशी :

श्रीपरशुरामानें त्रिहोत्रपुराहून ( बंगाल ) जे ब्राह्मण गोमंतकांत आणले, दशगोत्रांतील ब्राह्मणांपैकीं ही कौशिकगोत्री ब्राह्मणांची देवी. कौशिकगोत्री ब्राह्मणांस कर्दलीपूर – केळशी हें गांव अग्रहार मिळालें. जे गांव अग्रहार मिळालें तिथें त्यांनीं वसती केली आणि आपणाबरोबर आणलेल्या ह्या दैवतांचीहि त्यांनीं तिथेंच स्थापना केली. परशुरामानें आणखी कांहीं ब्राह्मण आणले त्यांचा इतिहास 'श्रीमंगेश'मध्यें आहेच. श्रीमंगेश आणि शांतादुर्गा या देवांची कुशस्थळी आणि कर्दलीपूर इथें स्थापना झाल्यावर गोमंतकावर अनेक राजांच्या स्वाऱ्या झाल्या. या स्वाऱ्यांचे परिणाम तेथील लोकांवर आणि देवालयांवरहि होणें अपरिहार्यच होतें.

गोमंतकावरील स्वाऱ्या :

प्रथम राजा मौर्य. मौर्यानंतर कदंबांची राजवट. राजा त्रिलोचन ऊर्फ जयंत कदंब या राजापासून षष्ठदेवापर्यंत गोमंतकावर कदंबांचें राज्य होतें. केळोशी येथें जुन्या इमारतीचे जे कांहीं अवशेष सांपडले त्यांत जुन्या वाड्याला एक कदंबकाळची कमान होती. त्या कमानीचें नांवच ' कदंबराजाची कमान ' असें होतें. ही कमान २५–३० वर्षांपूर्वींच नष्ट झाली.

इ. स. ४८९ च्या सुमारास कदंबांवर चालुक्य राजांनीं स्वारी करून कदंबराजास जिंकलें आणि चालुक्य कदंबांपासून खंडणी घेऊं लागले. कदंब घराण्यांतील षष्ठदेवानंतरचा राजा जयकेशी, यानें चालुक्यांशीं सख्य संपादून आपलें स्वातंत्र्य परत मिळविलें

आणि आपली राजधानी गोपकपट्टण म्हणजे हल्लीं गोमंतकांत ज्या भागाला थोरलें गोंवें म्हणतात तिथें आणली.

इ. स. ११९२ मध्यें वल्लाळ राजांनीं कदंबांवर स्वारी केली व ते त्यांच्याकडून खंडणी घेऊं लागले. त्यानंतर देवगिरीच्या राजांचें प्राबल्य वाढलें. त्यांनीं कदंबांपासून इ. स. १३१२ पर्यंत खंडणी घेतली. इ. स. १३१२ तच मुसलमानांनीं देवगिरीकरांचा वंश संपविला. तत्पूर्वीं ते धर्मवेडे गोमंतकांत शिरले. त्यांनीं तिथें फारच धुमाकूळ घातला. सावकारांस लुटलें, देवालयें मोडलीं, मूर्ति छिन्नविछिन्न केल्या आणि आपल्या मुसलमानी आक्रमणाचे इतर सारे पाशवी प्रकार तेथें केले.

हा मुसलमानांनीं केलेला कहर विजयनगरला समजला. त्या काळचे राजे हरिहरराय यांनीं मुसलमानांचा अत्याचार मोडून काढण्यासाठीं आपला प्रधान माधव यास नियुक्त केलें.

माधव प्रधानानें निवडक फौज बरोबर घेतली. वेगानें ती फौज गोमंतकांत आली. सोसाट्याचा वारा पालापाचोळा पार उडवून देतो त्याप्रमाणें विजयनगरच्या फौजेनें इस्लामी आक्रमकांना गोमंतकाबाहेर घालवून दिलें. मोडलेलीं देवळें पुन्हां बांधलीं, भ्रष्ट झालेल्या तीर्थक्षेत्रांचीं अर्चाशुद्धि केली, आणि भंगलेल्या देवता पुन्हां अखंड करून त्या त्या स्थानांवर स्थापन केल्या.

विजयनगरच्या राजानें अमराजी नांवाचा आपला प्रतिनिधि गोमंतकावर नेमला होता. या अमराजीनें नांवाप्रमाणेंच तीर्थक्षेत्रांच्या बाबतींत कांहीं चांगल्या अमर गोष्टी केल्या. आपल्या बुद्धिसामर्थ्यानें त्यानें गोमंतकाचा कारभार सुव्यवस्थित चालविला होता. पुढें बऱ्याच कालानंतर मात्र गोमंतकाचें दैव फिरलें.

बहामनी घराण्यांतील बेदरचा दुसरा महंमद याची दुष्ट दृष्टि गोमंतकावर गेली. प्रधान महंमद गवान याला सांगून आपलें

शस्त्रसज्ज दल त्यानें गोमंतकावर पाठविलें. अमराजी पराभूत झाला आणि गोमंतक पुन्हां मुसलमानांच्या हातांत गेला.

बेदराहून गोमंतकाचा कारभार पहाण्यास मुखत्यार नेमीत असत. मुखत्यारानें मनाला येईल तसा कारभार करावा. बेदरचा शेवटचा जो मुखत्यार ' मुलकू इयल मुलुकू ' हा बेदरच्या गादीशीं बेइमान झाला. तो विजापूरच्या आदिलशाहीस मिळाला. त्यामुळें १४९७ मध्यें गोमंतक पिकलेल्या फळाप्रमाणें आदिलशाहीच्या वशांत जाऊन पडला. त्यानंतर तेराच वर्षांनीं गोमंतकावर पोर्तुगीजांची धाड पडली.

पोर्तुगीजांचें खग्रास ग्रहण :

२७ फेब्रुवारी १५१० या दिवशीं तिमोजी नांवाच्या एका चांच्याच्या साहाय्यानें पोर्तुगीज सेनापति आफोंसद आल्बुकेर्कि यानें अकस्मात् समुद्रमार्गें छापा घालून गोवा शहर हस्तगत केलें. तेव्हांपासून तें अजूनहि पोर्तुगिजांच्या मगरमिठींतून सुटलें नाहीं.

सुरुवातीला आपलें राज्य सुखावह वाटावें म्हणून गोमंतकीयांस पोर्तुगिजांनीं पुष्कळच सवलती देऊन रामराज्याचा नुसता आभास दाखविला. धर्मवेड्या मुसलमानांच्या जाचाला कंटाळलेले हिंदु या दर्शनी सुखावह आभासाला राजी झाले. सार्‍या गोमंतकीयांना वाटूं लागलें कीं पोर्तुगिजांचें राज्य म्हणजे रामराज्यच. लोक आपल्या राज्यकारभाराला भुलले, हें जाणून पोर्तुगीज अधिकार्‍यांनीं संबंध गोवा प्रदेशाच्या नरडीभोंवतीं न कळत जाळें टाकलें. इतके दिवस गोवा शहरच त्यांच्या ताब्यांत होतें. जाळ्याच्या फांसांनीं गोवा पूर्ण गुंतला गेला त्याबरोबर पसरलेल्या जाळ्याचे दोर आंखडले जाऊं लागले. तरीपण त्यांना हे जाळ्याचे धागेदोरे संबंध गोवा प्रदेशभर पसरविण्यास एकतीस वर्षें लागलीं. सर्व हिंदु जाळ्यांत पूर्णपणें अडकले आणि पोर्तुगीज पाद्री हें जाळें वर खेचूं लागले.

**बाटवाबाटवीचा वणवा :**

१५४१ साल उजाडलें. पोर्तुगीज पाद्र्यांनीं ठरविलें, आतां सगळ्या हिंदूंना ख्रिश्चन करावयाचेंच. येशू ख्रिस्ताच्या लीलेचीं व्याख्यानें सुरू झालीं. पण तीं ऐकायलाहि कोणी तयार होईनात. पाद्री खवळले. आणि त्याच्यांतूनच त्यांच्या अत्याचारांना जन्म मिळाला. मुसलमानांचा धार्मिक जुलूम गोव्यावर झाला पण त्याहि-पेक्षां हा भयंकर होता. कारण मुसलमानांच्या छळांत गोमंतकांत कांहीं तरी देवळें शिल्लक होतीं असें वाटतें; पण तीं सर्वच्या सर्व मुसलमानांनींच फोडलीं असतीं तर बिचाऱ्या पोर्तुगिजांना फोडण्यास देवळें कुठून मिळालीं असतीं!

हिंदूंच्या पवित्र मंदिरांच्या मोडतोडीबरोबरच बाटवाबाटवीचा वणवा मोठ्या क्रूरतेनें पेटविला जाऊं लागला. साष्टीभागांतहि धाड आली, तेव्हां तेथील हिंदूंचें धाबें दणाणलें. जें कांहीं बरोबर नेण्या-सारखें होतें तें घेऊन वाट मिळेल त्या दिशेनें तेथील हिंदु पळूं लागले. ज्या देवांनीं रक्षण करावयाचें त्या देवांचेंच रक्षण करण्याची पाळी भक्तांवर आली. आपापलीं कुळदैवतें घेऊन हिंदु पळूं लागले. त्यांतल्या त्यांत एक सुदैवाची गोष्ट—गोमंतकाचा केंद्र भाग फोंडा महाल अंत्रुज हा राजे सौंधेकराच्या ताब्यांत होता. सौंधेकर हे कर्नाटकांतील शिरसी सौंध्याचे लिंगायत राजे. या हिंदु राजाच्याच प्रांतांत बहुतेक हिंदूंनीं आपापलीं कुळदैवतें ठेवून सुटकेचा दीर्घ निःश्वास टाकला.

**कैवल्यपुरांत श्रीशांतादुर्गा :**

इतर लोकांबरोबर केळशीकरांनींहि केळशी सोडली आणि तेहि श्रीशांतादुर्गेला घेऊन फोंडें महालांतच आले. फोंड्यापासून मैलसव्वामैलाच्या अंतरावर कैवल्यपुरांत त्यांनीं श्रीशांतादुर्गेची स्थापना केली.

जे हिंदु साष्टीत मागें राहिले होते ते बाटून ख्रिश्चन झाले. त्यांना बाटून शेंकडों वर्षें झालीं तरी श्रीशांतादुर्गेवरील त्यांची निष्ठा अजूनहि कायम आहे. श्रीशांतादुर्गेला ते 'माय' म्हणतात. माय म्हणजे आई. लग्नकार्यांच्या वेळीं ते या आईला तळी देण्यास विसरत नाहींत. तळी म्हणजे तांदूळ, नारळ, विडा. नवीन पीक आलें म्हणजे या 'आईला' एक पड निराळें काढून ठेवायचेंच. पड म्हणजे साधारण शेराएवढें माप. तसेंच कांहीं महत्त्वाचें काम निघाल्यास अथवा कोणतेंहि संकट आल्यास श्रीशांतादुर्गेचा कौल घेऊनच ते पुढें पाऊल टाकतात.

केळशीचें श्रीशांतादुर्गेचें (उद्ध्वस्त) मंदिर आणि आतांचें कवळें येथील मंदिर यांत बरेंचसें साम्य असलेलें दिसतें. पण आजूबाजूची निसर्गशोभा तर सारखीच आहे हें निश्चित. साष्टींतील देवांचें हें स्थलान्तर शके १४८६ रक्ताक्षी संवत्सर म्हणजे इ. स. १५६४ या सालीं झालें.

गोमंतकांतले सर्व महाल पोर्तुगिजांनीं घेतले तरी सौंधेकरांपासून अंत्रुज प्रांत पोर्तुगिजांस घेण्यास शेंकडों वर्षें लागलीं. श्रीशांतादुर्गाहि कवळ्यास आल्यानंतर सुमारें दोनशें वर्षांनीं —म्हणजे १७६३ मध्यें—फिरंग्यांचे प्रतिनिधि आणि सौंधेकर यांमध्यें नवीन तह होऊन तो प्रांत पोर्तुगिजांच्या गोव्यांतील राज्यास जोडला गेला. केळशीकर श्रीशांतादुर्गेस घेऊन कवळ्यास आले पण लगेच त्यांना श्रीशांतादुर्गेची स्थापना करतां आली नाहीं. कारण कवळें गांवांत त्यांना सगळ्याच गोष्टी नवीन होत्या. प्रथम रहाण्यास घर, पोटापाण्याची व्यवस्था, अंग झांकण्यापुरतें वस्त्र अशा कितीतरी समस्या त्यांच्यापुढें उभ्या होत्या. हळूहळू त्या समस्या सुटत गेल्या आणि मग त्यांच्या डोळ्यांसमोर देवीचें देऊळच उभें करण्याचें काम राहिलें.

कैवल्यपुरांत केळशीकरांना योग्य असें एकच एक स्थान दिसून आलें. पण त्या ठिकाणीं नेमका महारवाडा होता. तेथील हरिजनांना केळशीकरांच्या अडचणीची कुणकुण लागली. त्यांनीं आपली वस्ती हलविण्याचें कबूल केलें आणि आपण होऊन आनंदानें त्या ठिकाणची वस्ती हालविली. मात्र तेथून जातांना त्यांनीं केळशीकरांकडे एक मागणी केली कीं, ' वर्षांतून एकदांच आम्हांला हक्कानें देवीचें दर्शन घेऊं दिलें पाहिजे. ' ही त्यांची मागणी केळशीकरांनींहि लगेच मान्य केली. माघ शुद्ध षष्ठीच्या दिवशीं संध्याकाळीं हरिजन मंदिरांत प्रवेश करून आपलीं पंचवाद्यें वाजवितात. मोठ्या श्रद्धेनें श्रीशांतादुर्गेचें दर्शन घेतात. यावेळीं त्यांना तांदूळ, नारळ, विड्यावर कांहीं पैसे व देवीचें एक लुगडें देऊन त्यांचा सन्मान केला जातो. ही प्रथा अजूनहि चालू आहे. माघ मासांतील जत्रेची समाप्ति याच हरिजन-प्रवेशानें होत असते.

केळशीकरांनीं हरिजन त्या वस्तींतून निघून गेल्यावर इ. स. १५६४ ते १५६७ च्या दरम्यान प्रथम अगदीं छोटेंसें मंदिर त्या ठिकाणीं बांधलें. आणि रोजच्या रोज श्रीशांतादुर्गेची पूजाअर्चा, नैवेद्य वगैरे चालू केलें. पुढें कवळें गांवांतच ज्यांचा उदरनिर्वाह चालला ते कवळ्यासच राहिले. आणि बाकीचे पोटापाण्याच्या सोयीकरितां कोंकणांत आणि देशावर पांगले.

## नारो राम शेणवी

अशा प्रकारें पांगलेल्या मंडळींतूनच नारो राम शेणवी रेगे हे एक गृहस्थ सातारा दरबारीं फार थोर पदवीस चढले. दारिद्र्यानें अत्यंत पिडलेल्या या गृहस्थांनीं श्रीशांतादुर्गेची पुष्कळ दिवस मनोभावें सेवा केली. सेवेचा मुख्य हेतु आपलें दारिद्र्य नाहींसें व्हावें हा होता. परंतु तो तडीस जाण्याचें कांहीं चिन्ह

दिसेना. तेव्हां त्यांनीं ‘ दारिद्र्यांत मरण बरं ’ असें मानून मनाशीं आत्महत्येचा निश्चय केला. त्याच्या आदल्या रात्रीं ते मंदिरांत कीर्तनास येऊन बसले. तेवढ्यांतच त्यांना डुलकी लागली; आणि त्यांनीं एक चमत्कार पाहिला. एक दिव्य स्त्री त्यांच्या स्वप्नांत आली. तिनें त्यांना अभय देत म्हटलें, “ तुझ्या मनांत असलेला अविचार सोडून दे. आतां यापुढें तुझे वैभवाचे दिवस आहेत. तुला वाटेल त्या ठिकाणीं तूं जा. जिथें जाशील त्या ठिकाणीं तूं विजयी होशील. मात्र एवढें कर — देहत्यागाच्या ऐवजीं देशत्याग कर. ” असें सांगून ती दिव्य स्त्री अदृश्य झाली. हे गृहस्थ जागे झाले. त्यांच्या चेहऱ्यावरील दारिद्र्याची अवकळा मावळली आणि एक आगळेंच तेज त्यांच्या तोंडावर चमकूं लागलें. श्रीशांतादुर्गेस साष्टांग नमस्कार घालून दुसऱ्याच दिवशीं हे गृहस्थ तेथून निघाले ते थेट साताऱ्याला आले.

महाराष्ट्रांत या वेळीं हिंदुपद्पातशाहीच्या दोन गाद्या होत्या; एक कोल्हापूर व दुसरी सातारा. साताऱ्याच्या गादीवर त्या वेळीं श्रीछत्रपति शाहूमहाराज हे होते. त्यांचा आश्रय या गृहस्थानें घेतला. श्रीशाहूमहाराजांनीं या गृहस्थांस त्यांचें नांव विचारलें, तेव्हां ते म्हणाले, “ माझें नांव नारो राम शेणवी रेगे. मी वेंगुर्ल्या-जवळील कोचरे या गांवचा. बेकारीला अगदीं कंटाळलों आहें. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या गादीची कांहींतरी सेवा घडावी हा हेतु मनांत धरून येथवर आलों आहें. ” श्रीशाहूमहाराजांनीं त्यांना आपल्या पदरीं ठेवून घेतलें.

### दरिद्री मंत्री झाला :

नारो रामांनीं आपल्या अंगच्या गुणांनीं श्रीशाहू छत्र-पतींचा विश्वास संपादन केला. थोड्याच दिवसांत नारो राम यांची राजनिष्ठा, लोकहिततत्परता, चातुर्य, सचोटी इत्यादि गुणांनीं नारो

कैवल्यपुरांत केळशीकरांना योग्य असें एकच एक स्थान दिसून आलें. पण त्या ठिकाणीं नेमका महारवाडा होता. तेथील हरिजनांना केळशीकरांच्या अडचणीची कुणकुण लागली. त्यांनीं आपली वस्ती हलविण्याचें कबूल केलें आणि आपण होऊन आनंदानें त्या ठिकाणची वस्ती हालविली. मात्र तेथून जातांना त्यांनीं केळशीकरांकडे एक मागणी केली कीं, ' वर्षांतून एकदांच आम्हांला हक्कानें देवीचें दर्शन घेऊं दिलें पाहिजे. ' ही त्यांची मागणी केळशीकरांनींहि लगेच मान्य केली. माघ शुद्ध षष्ठीच्या दिवशीं संध्याकाळीं हरिजन मंदिरांत प्रवेश करून आपलीं पंचवाद्यें वाजवितात. मोठ्या श्रद्धेनें श्रीशांतादुर्गेचें दर्शन घेतात. यावेळीं त्यांना तांदूळ, नारळ, विड्यावर कांहीं पैसे व देवीचें एक लुगडें देऊन त्यांचा सन्मान केला जातो. ही प्रथा अजूनहि चालू आहे. माघ मासांतील जत्रेची समाप्ति याच हरिजन-प्रवेशानें होत असते.

केळशीकरांनीं हरिजन त्या वस्तींतून निघून गेल्यावर इ. स. १५६४ ते १५६७ च्या दरम्यान प्रथम अगदीं छोटेंसें मंदिर त्या ठिकाणीं बांधलें. आणि रोजच्या रोज श्रीशांतादुर्गेची पूजा-अर्चा, नैवेद्य वगैरे चालू केलें. पुढें कवळें गांवांतच ज्यांचा उदरनिर्वाह चालला ते कवळ्यासच राहिले. आणि बाकीचे पोटापाण्याच्या सोयीकरितां कोंकणांत आणि देशावर पांगले.

## नारो राम शेणवी

अशा प्रकारें पांगलेल्या मंडळींतूनच नारो राम शेणवी रेगे हे एक गृहस्थ सातारा दरबारीं फार थोर पदवीस चढले. दारिद्र्यानें अत्यंत पिडलेल्या या गृहस्थांनीं श्रीशांतादुर्गेची पुष्कळ दिवस मनोभावें सेवा केली. सेवेचा मुख्य हेतु आपलें दारिद्र्य नाहींसें व्हावें हा होता. परंतु तो तडीस जाण्याचें कांहीं चिन्ह

दिसेना. तेव्हां त्यांनीं ‘ दारिद्र्यांत मरण बरं ’ असें मानून मनाशीं आत्महत्येचा निश्चय केला. त्याच्या आदल्या रात्रीं ते मंदिरांत कीर्तनास येऊन बसले. तेवढ्यांतच त्यांना डुलकी लागली; आणि त्यांनीं एक चमत्कार पाहिला. एक दिव्य स्त्री त्यांच्या स्वप्नांत आली. तिनें त्यांना अभय देत म्हटलें, “ तुझ्या मनांत असलेला अविचार सोडून दे. आतां यापुढें तुझे वैभवाचे दिवस आहेत. तुला वाटेल त्या ठिकाणीं तूं जा. जिथें जाशील त्या ठिकाणीं तूं विजयी होशील. मात्र एवढें कर — देहत्यागाच्या ऐवजीं देशत्याग कर. ” असें सांगून ती दिव्य स्त्री अदृश्य झाली. हे गृहस्थ जागे झाले. त्यांच्या चेहऱ्यावरील दारिद्र्याची अवकळा मावळली आणि एक आगळेंच तेज त्यांच्या तोंडावर चमकूं लागलें. श्रीशांतादुर्गेस साष्टांग नमस्कार घालून दुसऱ्याच दिवशीं हे गृहस्थ तेथून निघाले ते थेट साताऱ्याला आले.

महाराष्ट्रांत या वेळीं हिंदुपद्पातशाहीच्या दोन गाद्या होत्या; एक कोल्हापूर व दुसरी सातारा. साताऱ्याच्या गादीवर त्या वेळीं श्रीछत्रपति शाहूमहाराज हे होते. त्यांचा आश्रय या गृहस्थानें घेतला. श्रीशाहूमहाराजांनीं या गृहस्थांस त्यांचें नांव विचारलें, तेव्हां ते म्हणाले, “ माझें नांव नारो राम शेणवी रेगे. मी वेंगुर्ल्या-जवळील कोचरे या गांवचा. बेकारीला अगदीं कंटाळलों आहें. श्रीछत्रपति शिवाजी महाराजांच्या गादीची कांहींतरी सेवा घडावी हा हेतु मनांत धरून येथवर आलों आहें. ” श्रीशाहूमहाराजांनीं त्यांना आपल्या पदरीं ठेवून घेतलें.

## दरिद्री मंत्री झाला

नारो रामांनीं आपल्या अंगच्या गुणांनीं श्रीशाहू छत्र-पतींचा विश्वास संपादन केला. थोडयाच दिवसांत नारो राम यांची राजनिष्ठा, लोकहिततत्परता, चातुर्य, सचोटी इत्यादि गुणांनीं नारो

राम यांना मंत्र्याचीं वस्त्रें अर्पण करण्यांत आलीं. आणि प्रधान-मंडळांत त्यांचा समावेश झाला.

" आतां यापुढें तुझे वैभवाचे दिवस आहेत. तुला वाटेल त्या ठिकाणीं तूं जा. जिथें जाशील त्या ठिकाणीं तूं विजयी होशील. " हा श्रीशांतादुर्गेचा आशीर्वाद खरा ठरला. नारो राम आतां नारो राम शेणवी नव्हते तर नारो राम मंत्री झाले होते आणि तेहि हिंदुपद्पातशाहीचे.

ज्या देवीच्या कृपाप्रसादानें आपल्याला एवढ्या वैभवाच्या शिखरावर चढविलें त्याच वैभवांत तिचें दर्शन घेतलें पाहिजे, असा विचार करून नारो राम आपल्या इतमामानिशीं शांतादुर्गेच्या दर्शनास निघाले. गोमंतकांत जाऊन कवळ्यास श्रीशांतादुर्गेच्या देवळाच्या पायऱ्या चढूं लागले तेव्हां आनंदाश्रूंनीं त्यांचे डोळे भरून आले.

मंत्री नारो रामांना आपल्या कुलदेवतेचें तें मोडकें तोडकें मंदिर पहावेना. नारो रामांनीं लगेच मंदिराच्या जीर्णोद्धाराचें काम हातीं घेतलें. त्या जुन्या जीर्ण मंदिराच्या जागीं आतां एक भव्य नि भक्कम मंदिर शोभूं लागलें. अग्रशालाहि त्याच पद्धतीच्या तयार झाल्या. मंदिराच्या शिखराचेंहि महत्त्वाचें काम पार पडलें आणि कळस मोठ्या अभिमानानें शिखरावर विराजमान झाला. त्यानंतर नारो रामांनीं शाहू छत्रपति यांचे मुख्य प्रधान प्रसिद्ध पहिले बाजीराव यांना कळवून इ. स. १७३९ मध्यें कवळें गांव श्रीशांतादुर्गेची पूजाअर्चा, धूपदीप, नैवेद्य याकरितां इनाम देवविला.

श्री
राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाजीराव
बल्लाळ प्रधान

मुळात हा शिक्का वाटोळा आहे.

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी रा. रा. बाजीराव पंडित प्रधान ता॥ मोकदमानी मौजे कवळें तपे अंतरूज मामले फोंडा सु॥ आर्बैन मया अलफ ( इ स. १७३९ ) श्री. देवी मु॥ मौजे मजकूर तेथील पूजाअर्चा, नेवेद्य, नंदादीप उत्छाव चालविलिया श्रेयस्कर जाणोन मौजे मजकूर श्रीचे उर्जेस कुळबाब कुळकानू हालीपटी व पेस्तरपेटी खेरीज हकदार व कदीम इनामदार करून नूतन इनाम दिला असे. तर तुम्ही श्रीकडे रुजू होऊन मौजे मजकुरचा वसुल देणें. नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटीयास श्रीकडे परतोन देणें जाणिजे जमादिलावर

( लेखन सीमा )


**अशा प्रकारची ही सनद मोकदमानी, तसेंच देशमुख, देशपांडे यांस स्वतःच्या शिक्क्यानिशीं आज्ञापत्र लिहून मराठ्यांचे गोमंतकांतील सर सुभेदार राजेश्री नारो चिमणाजी गोसावी यांकडे रवाना केली.**

## नारो राम मंत्री यांचें देशमुख व देशपांडे यांस पत्र :

द्र मा॥ अनाम देशमुख व देशपाडे ता॥ अंतरूज मामले फोंडा यांसी नारोराम मंत्री सुहूरसन आर्बैन मया व अलफ ( इ स १७३९ ) श्रीदेवी मु॥ कवळें तपे मजकूर येथील पूजाउर्जा, नेवेद्य, नंदादीप उत्साह चालवयाबद्दल मौचे मजकूर कुळबाब कुळकानू खेरीज हकदार व इनामदार करून नूतन इनाम राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यांनीं देऊन आलाहिदा सनदा सादर केल्या आहेत. त्यास॥ मौजे मजकुराचा ऐवज श्री कडे वीकुसूर पावीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटीयास श्री. पुजारी यापाशीं परतोन देणे जाणिजे छ सवाल पा॥ हूजूर

( लेखन सीमा )

याप्रमाणें व्यवस्था झाली. पण नारो चिमणाजीकडून देवीस उत्पन्न येईना. ही गोष्ट पेशव्यांच्या दरबारपर्यंत गेली. चिमणाजी अप्पा नारो चिमणाजीवर चिडले. त्यांनीं नारो चिमणाजीची चांगलीच हजेरी घेतली. तेव्हां नारो चिमणाजीनें आपल्या नांवानें गांवकरी व कुळकर्णी यांस आज्ञापत्रें लिहिलीं. तरीहि इनामगांवचें उत्पन्न देवीकडे येईना. पुन्हां तक्रार पेशव्यांच्या दरबारीं गेली. या वेळीं बाजीराव पेशवे वारले होते व बाळाजी बाजीराव यांस



श्रीशांतादुर्गा नवरात्रोत्सव : सजविलेल्या मखरांतील उत्सवमूर्ति

पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं होतीं. नानासाहेब पेशवे यांनीं देशमुख - देशपांडयांना पुन्हां पत्रें लिहिलीं आणि नारो चिमणाजीस पुन्हां ताकीद देवविली. तेव्हांपासून मात्र इनामगांवचें उत्पन्न श्रीशांतादुर्गेकडे येऊं लागलें.

आपल्या कुळदैवताकरितां नारो राम मंत्री यांनीं जें कृतज्ञतापूर्वक काम केलें त्याला श्रीशांतादुर्गेच्या इतिहासांत तरी तोड नाहीं. म्हणून श्रीशांतादुर्गेच्या दर्शनास मंत्र्यांचे वंशज आले असतां त्यांस संस्थानांतील इतमामानिशीं सामोरें जाण्याचा प्रघात अजून आहे. देवीच्या आरतीच्या वेळीं मंत्र्यांस बोलावण्यास वेत्रधार व मशाल पाठविली जाते. देवळांत मंत्र्यांच्याकरितां बसण्यास ठराविक जागा आहे. मंत्री पुन्हां घरीं जातेवेळीं बहुमानाचें देवीचें प्रसादवस्त्र त्यांना देण्यांत येतें. अशा प्रकारचा मंत्र्यांचा सन्मान आजहि संस्थानांत राखला जातो.

नारो राम यांच्यानंतर अनेक भक्त-उपासकांनीं देवीच्या भांडारांत बरीच भर घातली. पण त्याचबरोबर दुर्दैवानें एक मोठा दरोडाहि या संस्थानावर पडला. इ. स. १८९८ सालीं आकस्मिकपणें पठाणांची धाड आली. आणि जडावाचे दागिने, कवचें, सोन्यारुप्याची चीजवस्तु आणि रोकड मिळून त्यावेळच्या सोन्याच्या किमतीप्रमाणें एक लाखाच्यावर माल चोरीस गेला. या पठाणांना पकडण्याकरितां दक्ष पोर्तुगीज सरकारचें सैन्य बॅंड लावून गोव्याच्या सरहद्दीपर्यंत आलें असें सांगतात. वाजत गाजत चोरांना पकडण्याच्या या अजब तऱ्हेचें रहस्य फक्त पोर्तुगीजच जाणूं शकतील !

## कौशिकगोत्री ब्राह्मणांचीं हल्लींचीं उपनामें.

परशुरामानें जे दशगोत्राचे ब्राह्मण त्रिहोत्रपुराहून आणले त्यांतील कौशिकगोत्राची देवी श्रीशांतादुर्गा. तथापि वत्स व भारद्वाज गोत्राचेहि कांहीं लोक याच देवीला आपली कुलदेवता मानतात.

कौशिक गोत्राचीं मूळ बारा उपनामें. या बारा नांवांतूनच अनेक नांवें निघालीं आहेत. त्यांतल्यात्यांत रेगे या नांवांतून तर पुष्कळच नवीन उपनामें निघालीं. पहिलीं बारा अशीं आहेत : महाले, हरपती, वैद्य, सुखठणकर, भांडारी, दोंदे, रामाणी, श्रीधरपै, रेगे, शिंसाणी, गायतोंडे, साखरदांडे. वत्स गोत्राचे वर्दे आणि भारद्वाज गोत्राचे पाणंदीकर. यांना 'श्रीशांतादुर्गेचे महाजन' असें म्हणतात. महाजन म्हणजे श्रीशांतादुर्गा संस्थानच्या संस्थापकांचे वंशज. या वंशांतलिच लोक तेथील व्यवस्था पहातात. त्रैवार्षिक निवडणूक होते. त्यांत खजिनदार, चिटणीस आणि मुखत्यार यांची निवडणूक बहुमतानें होत असते. अध्यक्षाची नेमणूक मात्र सरकार करीत असतें. या सर्वांवर आदमिनिस्तादोर म्हणजे पोर्तुगीज मामालेदार याची देखरेख असते.

उत्पन्न :

कांहीं ग्रामसंस्थांकडून दरसाल येणारी रकम, कांहीं ग्राम-संस्थांचे शेअर्सवरील मिळकत, संस्थानची शेती-बागाईती, नवस, व देवकृत्याचें भांडार, कर्जाऊ रकमांचेवरील व्याज मिळून वार्षिक सुमारें वीसएक हजाराचें उत्पन्न आहे आणि तेवढाच खर्चहि पण आहे.

नोकरवर्ग :


२ अभिषेकी, ४ पुजारी, १ ज्योतकर, १ पुराणिक, १ हरि-दास, १ वेत्रधार, १७ वाजंत्री, ६ चौघडेवाले, २ मशाल धरणारे, ४ शिपाई, १० घरें कलावंतिणींचीं, १ मृदंगी, १ ताल धरणारा, २ भावणी, ४ झाडलोट करणारे, २ दिवे लावणारे, १ सोनार, १ सुतार, १ लोहार, १ परीट, १ तांबट, १ माळी.

हे सर्व नोकर आपापलीं कामें देवीवर श्रद्धा ठेवून वेळचेवेळीं करीत असतात. कांहीं तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं जशी पैसे

मागण्याची चाल आहे तशी इथें नाहीं. भाविक लोकांकडे पैसे मागणें हें इथें उलट कमीपणाचें मानलें जातें.

नित्यनियम व नोकरांचीं कामें :

पहांटे पांचच्या ठोक्याला चौघडा झडूं लागतो. सनईचे सुस्वर सूर मंद वाऱ्याबरोबर जिकडे तिकडे पसरतात. देवाचे शिपायी



श्रीशांतादुर्गा . मुख्य पीठावरील मूर्ति

महाद्वार उघडतात. ज्योतकर देवीसमोरच्या उभ्या दीपमालिका लावतात. पुजारी ताज्या पाण्याची स्वच्छ कळशी भरून घेऊन येतात. देवीचें निर्माल्य विसर्जन करतात. गाभारा झाडून स्वच्छ करतात. पाणी भरून ठेवतात. गंध उगाळतात. देवीवर अभिषेक-पात्र लावलें जातें आणि अभिषेकी यांस अभिषेकाला लागणाऱ्या

अभिषेक-वस्तूंची सिद्धता करून ठेवली जाते. बाहेरील आवार, सभागृह, वगैरे मंदिरांतील बाहेरचे सर्व भाग पैरीकार म्हणजे आवार झाडणारे पाळीवाले झाडून स्वच्छ करतात. तोंच एक ब्राह्मण हातांत पूजासाहित्य घेऊन येतांना दिसतात. हेच ते अभिषेकी. अभिषेकी म्हणजे अभिषेक करणारे. यांना संस्थानचे उपाध्याय असेंहि म्हणतां येईल. अभिषेकी येतांच देवीला अभिषेक करण्या-साठीं विविध रंगांचीं सोवळीं नेसलेले महाजन येऊन उपस्थित होतात. त्यांच्या हातांत ते करणार असलेल्या देवकृत्याची नोंद व ते पैसे भरल्याची पावती असते. अभिषेकी ती नोंद हातीं घेऊन पहातात. त्यांत कुणाचा अभिषेक, कुणाचा लघुरुद्र, कुणाचें कुंकु-मार्चन असे देवकृत्याचे निरनिराळे प्रकार असतात. कुंकुमार्चन म्हणजे आपण जसें बेल, दूर्वा, तुळशी, सहस्रनामानें अथवा अष्टोत्तरानें वहातों तसेंच कुंकू चिमूट चिमूट देवीच्या पायांवर वहाणें. ११ वाजेपर्यंत हें देवकृत्य चालतें. बरोबर अकराला चौघडा पुन्हां सुरू होतो आणि त्यानंतर मात्र अभिषेक बंद होतो. पुजारी मूर्ति पुसतात. देवीला लुगडें, वस्त्र नेसवितात. कुंकूं, फुलें, हार वगैरेंनीं मूर्ति सजविली जाते. तेवढ्यांत एक घंटेचा नाद होतो. हा नाद ठराविक संकेताचा करण्यांत येतो. याला 'इशारत' असें म्हणतात. वाजंत्री, सेवेकरी, महाजन वगैरे लोकांस आरतीकरितां दिलेला हा इशारा असतो. पांच दहा मिनिटांत वाजंत्री आणि महाजन लोक देवळांत जमा होतात. पुजारी महानैवेद्य घेऊन येतात. अभिषेकी आरती ओंवाळूं लागतांच पंचवाद्यें वाजूं लागतात. या वेळीं देवीला ज्या आरती ओंवळतात त्या मोठ्या पहाण्यासारख्या असतात. ५०–६० निरांजनांच्या त्या सुरूच्या झाडाच्या आकाराच्या आरत्या असतात. त्या आरत्यांना 'झाड' असेंच म्हणतात. सर्व आरत्या ओंवाळून झाल्यावर कापुराची आरती

ओंवाळण्यांत येते. मंत्रपुष्प, प्रदक्षिणा, नमस्कार, प्रार्थना झाल्यावर सकाळपासून चाललेल्या कार्यक्रमाची सांगता होते.

संध्याकाळचे पांच वाजले कीं तिसऱ्यांदा चौघडा सुरू होतो. हा चांगला तासभर वाजत असतो. त्यानंतर पुन्हां पंचवाद्यांची नौबत झडते. सायंकाळीं ७॥ वाजतां पुराणिक पुराण सुरू करतात तें ८॥ ला संपतें. तोंच कीर्तनी म्हणजे हरिदास, टाळदार, मृदंगी हे येतात आणि कीर्तनास सुरुवात होते. कीर्तन संपत येतांच दुपार-प्रमाणेंच 'इशारत' होते. मात्र ती नगाऱ्यावर. वाजंत्री जमा होतात. दुपारच्या प्रमाणेंच आरती झाल्यावर मंत्रपुष्प व प्रार्थना होतांच सर्व लोक सभागृहांत येऊन बसतात. तेथें कलावंतिणीचें गाणें चालू झालेलें असतें. गाणें चालूं असतांच खिरापत वांटण्यांत येतें. सर्वांना खिरापत वांटून झाल्यावर गाणें संपतें. लोक आपापल्या बिऱ्हाडीं निघून जातात आणि देवालयाचीं दारें बंद होतात.

१३६६२

देवकृत्ये :

अभिषेक, आवर्तन, एकादशणी, लघुरुद्र, महारुद्र, नवचंडी जपद्वारां, नवचंडी हवनद्वारां, शतचंडी जपद्वारां, शतचंडी हवनद्वारां, नैवेद्य पंचायतनास, ब्राह्मण-सुवासिनी-कुमारिका संतर्पण (भोजन), दंपत्यस्थान, वाराची पूजा, देवालयाच्या शिखरावर पणत्या लावणें, दीपस्तंभावर पणत्या लावणें अशीं तेथील देवकृत्यें असतात.

वरील देवकृत्यांचे ठराविक पैसे उपाध्ये, अभिषेकी यांकडे द्यावे लागतात. त्याची पावती रीतसर मिळते. सदर देवकृत्यांच्या रकमेची वांटणी दर महिन्यास होऊन सर्व नोकरवर्गास त्याचा ठराविक भाग वांटून देण्यांत येतो. जितकें जास्त देवकृत्य होईल त्याप्रमाणें नोकरांस वांटणीचा भाग अर्थात् जास्त मिळत असतो.

उत्सव :

दर पंधरवड्यांतील पंचमीस देवीची पालखींतून देवालयाच्या आवारांतच मिरवणूक निघते. या दिवशीं पुराण, कीर्तन झाल्यावर पालखी देवळाबाहेर पडते. देवालयाच्या आवारांतच या पालखीचे ठराविक टप्पे असतात. या टप्प्यास 'पेणें' असें नांव आहे. पालखी 'पेण्यास' थांबली कीं नित्याचे हरिदास एखादा अभंग म्हणतात. त्यानंतर कलावंतिणीचें नाच-गाणें होतें. तें संपतांच वेत्रधार ( याला 'कारकार' अशी संज्ञा आहे ) जयजयकार करतो; म्हणजे पंचवाद्यें व चौघडा यांच्या घोषांत पालखी पुढें जाते. याच पद्धतीनें सर्व वाहनांची मिरवणूक निघत असते. उत्सवाच्या दिवसांत मिरवणुकींत दारूकाम होतें तें अतिशय प्रेक्षणीय असतें. पंचमीचा दिवस हा महत्त्वाचा मानला जातो.

याशिवाय वार्षिक उत्सवहि या संस्थानांत होत असतात. त्यांपैकीं ठळक उत्सव म्हणजे वैशाख शुद्ध पंचमी, नवरात्र, दसरा, कोजागिरी, कार्तिकांत वनभोजन. माघ शुद्ध प्रतिपदेपासून षष्ठीपर्यंत देवीचा मुख्य वार्षिकोत्सव होत असतो. प्रतिपदेपासून रोज निरनिराळ्या वाहनांतून मिरवणूक निघते; गांवजेवणहि होतें. पंचमीला रथोत्सव होऊन षष्ठीच्या दिवशीं हरिजनप्रवेशानें या उत्सवाची समाप्ति होते.

■ ■ ■

श्रीशांतादुर्गेसारखीं आणखी लहानमोठीं कितीतरी देवस्थानें गोमंतकाच्या पुण्यभूमींत आहेत आज आपणां सर्वांना तिथें जाऊन या दैवतांचें दर्शन घेणें पहिल्याइतकें सुलभ राहिलें नाहीं. पण एक दिवस असा येईल कीं, गोमंतकाच्या उद्याचलावर स्वातंत्र्यसूर्य उगवेल आणि अखिल भारतवर्षांतील कोणाहि हिंदु नागरिकाला या पुण्यभूमींत जाऊन आपल्या भक्तकामकल्पद्रुम दैवतांचें दर्शन घेतां येईल, असा विश्वास आपण बाळगूं या.

■ ■ ■

सांप्रदायिक धर्मपीठें :

गोमंतकांत श्रीशान्तादुर्गा देवस्थानाप्रमाणेंच अनेक लहानमोठीं दैवतें आहेत. त्यांतील प्रसिद्ध श्रीमंगेश इत्यादि कुलदैवतें मानणारे गोमंतकीय गौड सारस्वत ब्राह्मण असून ते स्मार्त संप्रदायी आहेत. आपल्याला हे प्रसिद्ध गौड पादाचार्य मठाचे अनुयायी म्हणवितात. या स्मार्त सांप्रदायिकांचें धर्मपीठ मूळ मठग्राम (मडगांव) येथें साष्टी विभागांत होतें. केळोशी व कुशस्थळी येथेंहि या सांप्रदायाचे मठ असल्याचे उल्लेख आहेत. परंतु पुढें पोर्तुगिजांच्या बाटवाबाटवीच्या धाडीमुळें देवदेवतांचें जें स्थलान्तर झालें त्या धामधुमींत या मठांचेंहि स्थलान्तर कैवल्यपूर ( कवळें ) येथें झालें.



श्रीमंगेश

तेव्हांपासून "कैवल्यमठ" किंवा "कवळें मठ" म्हणूनच तें ओळखलें जाऊं लागलें.

कवळें मठ हा मुख्य; तथापि त्याचीच एक शाखा कालान्तरानें चित्रापूरमठ ( शिराळी मठ ) म्हणून सुरू झाली. श्रीमत् परिज्ञानाश्रम हे मठ-शाखेचे मूळ संस्थापक होते.

कैवल्यपूर मठाधीश कवळें येथें येतात त्या वेळीं महाजन आणि शांतादुर्गा देवस्थानाची कारभारी मंडळी देवस्थानाच्या लवाजम्यानिशीं श्रींना सामोरे जातात. त्यांना सन्मानानें देवळांत आणून तेथें त्यांची पाद्यपूजा करतात

या मठाधीशांचें वास्तव्य कवळें येथें असल्यास त्यांना उत्सवाचे दिवशीं वाद्यें, मशाल इत्यादि इतमाम वाढवून आमंत्रणपूर्वक देवळांत आणण्याची वहिवाट आहे. पंचमीचा दिवस हा शान्तादुर्गा देवस्थानांत नित्य पर्वणीचाच असतो. त्या दिवशीं मठाधीशांचें वास्तव्य कवळ्यास असल्यास त्यांना देवीच्या पूजेसाठीं देवळांत आणण्याकरितां देवस्थानाचा काठकार व वाद्यें इत्यादि सरंजाम त्यांच्या निवासस्थानीं पाठविण्यांत येतो. पूजादि आटोपल्यावर अशा सन्मानानेंच त्यांना स्वस्थानीं पोहोंचविण्यांतहि येतें. याप्रमाणेंच चित्रापूर मठाधीशांचाहि मानपान श्रीशान्तादुर्गा देवस्थानांत राखला जातो.

■ ■ ■

८५९८० दि: २१-५-२५
१७० २२।३।७

## थोडा जुना व नवा इतिहास

आज आपण ‘ कवळ्याची श्रीशांतादुर्गा ’ असें म्हणतों, परंतु ती गोमंतकांत मूळ आली ती कर्दळीपूर म्हणजेच केळोशी या ठिकाणीं. केळोशी येथें श्रीशांतादुर्गेचें लहानसेंच प्राचीन पद्धतीचें पण सुंदर देवालय होतें; परंतु कालान्तरानें तें मोडकळीस आलें. त्यामुळें त्याचा जीर्णोद्धार एका धार्मिकानें केला; त्याचें नांव अनु शेणवी. हा हिंदु धर्माचा कट्टा अभिमानी असून तो हिंदूंचा मोठा साहाय्यकर्ता होता इतकेंच नव्हे तर ‘बाटवून’ (बाटून नव्हे !) ख्रिस्ती झालेल्यांना शुद्ध करून हिंदुधर्मांत परत घेण्याचाहि उद्योग या धर्माभिमानी पुरुषानें केला होता. “ अनु शेणवी हा ख्रिस्ती धर्माला विरोधी असल्यानें त्याला त्याबद्दल योग्य तें शासन केलें पाहिजे ” अशी तक्रार गोमंतकांतील ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या मार्फत पोर्तुगालच्या राजाकडे गेल्याची नोंद आहे.

ख्रिस्ती बाटवाबाटवीच्या प्रलयांत याहि देवालयाची आहुति पडली (इ. स. १५६६ मध्यें); परंतु देवीला मात्र महाजनांनीं सुखरूपपणें दुसरीकडे हालविलें. केळोशीच्या त्या जुन्या मंदिराची जागा पुढें पोर्तुगीज सरकारनें आपल्या ताब्यांत घेऊन एका ख्रिस्ती माणसाला देऊन टाकली. पूर्वीच्या देवस्थानापाशीं दीपमाळा, तलाव वगैरे जें कांहीं प्रेक्षणीय होतें त्याचा आतां मागमूसहि उरलेला नाहीं. तथापि त्या जुन्या देवळाची एक आठवण मात्र सांगण्यासारखी आहे. ‘ गोमंतकीय ज्ञात आद्यकवि ’ म्हणून डॉ. पिसुर्लेकरांनीं ज्यांचा गौरवपर उल्लेख केलेला आहे तो कृष्णदास शामा हा केळोशीचाच सारस्वत ब्राह्मण होता. ‘ कृष्णचरित्र कथा ’ या त्यानें लिहिलेल्या मराठी ग्रंथाचा श्रीगणेशा इ. स. १५२६ मध्यें या देवालयांत बसूनच त्यानें केला. गोमंतकांत सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत या संतकवीचा मोठा बोलबाला असावा. त्याचें साहित्य

मोठें लोकप्रिय असलें पाहिजे कारण त्याच्या अनेक मराठी कथांचें कोंकणींत रूपांतर झालेलें आहे. केळोशीचें जुनें मंदिर धर्मद्वेष्ट्या मूर्तिभंजकांनीं उद्ध्वस्त केलें तरी त्या मंदिराशीं स्मृति-संबद्ध असलेल्या या संतकवीचें नांव मात्र त्यांना पुसतां आलेलें नाहीं उलट जेजुइतासाठीं त्यांच्याचपैकीं कांहींनीं (कदाचित् बाटलेल्यांनीं) या कवीचें साहित्य मराठींतून कोंकणींत आणलें!

श्रीशांतादुर्गा संस्थानच्या महाजनपणाचा अधिकार आनुवंशिक व शाश्वत असून गौडसारस्वत कौशिकगोत्री, वत्स गोत्री वर्दे व भारद्वाज गोत्री पाळंदीकर अथवा पाणंदीकर या उपनांवांच्या गृहस्थांस व त्यांच्या पुरुष संततीस प्राप्त होत असतो. शिवाय जे कोणी आपण सदर अधिकारी असल्याचें योग्य पुराव्यानिशीं सिद्ध करतील त्यांसहि हा अधिकार मिळूं शकतो. गोमंतकाबाहेर जे या महाजनांचे वंशज असतील त्यांची नोंद यादींत (याला कातालग म्हणतात) नसली तरी ते या संस्थानचे महाजनच म्हटले जातात, असें समजतें.

केळोशीहून हाललेली आणि कवळ्यास येऊन सुस्थापित झालेली श्रीशांतादुर्गा आज आपल्यासमोर आहे. या श्रीशांतादुर्गा देवीची नवीन आद्यपीठ मूर्ति शके १८२३ प्लव संवत्सर फाल्गुन शुद्ध दशमी बुधवारीं सुप्रतिष्ठित करण्यांत आली. आणि शके १८२९ फाल्गुन शुद्ध सप्तमीस नूतन प्रसादपट्टा (सिंहपट्टा) स्थापन केला. या उभय प्रतिष्ठांचा स्मारकोत्सव, प्रतिवर्षी फाल्गुन शु. सप्तमीपासून दशमीपर्यंत होत असतो.

सदर श्रीच्या मूर्तीच्या सुप्रतिष्ठोत्सवास, आसेतुहिमाचल श्रीच्या व इतर देवस्थानच्या महाजनांस आणि वैदिक ब्राह्मणांस आमंत्रणें गेल्यामुळें या महोत्सवास बरीच मोठी गर्दी झाली होती.

गौडसारस्वत ब्राह्मणांचे विद्यमान् धर्मगुरु श्रीमत्पूर्णानंदसरस्वती गौडपादाचार्य मठ कैवल्यपूर यांची स्वारी या महोत्सवप्रसंगीं उपस्थित होती.

या उत्सवप्रसंगाचा वर्णनपर श्लोक चंदगडचे रा. रा. सखाराम नारायण करंडे यांनीं केलेला आहे तो असा —

कैवल्ये रामबाहूरगधरणि ( १८२३ ) शाके फाल्गुने शुद्ध पक्षे ॥
बौद्धे वारे दशम्यां दशमिति घटिके सन्मुहूर्ते प्लवाब्दे ॥
शांतादुर्गाख्य देव्या जगदवनपटो दिव्यमूर्तिप्रतिष्ठा ॥
रम्योत्साहस्त्वभूद्यः सकलजनमनस्तेन हर्षैक्यपूर्णम् ॥ १ ॥

■ ■ ■

श्रीशांतादुर्गा केळोशीहून कवळ्याला येऊन सुप्रतिष्ठित झाली आणि कवळ्याची शांतादुर्गा म्हणूनच तिची ख्याति आपण ऐकतों. तरीपण तिचें अगदीं मूळचें नांव सांतेरी असल्याचा उल्लेख आढळतो. केळोशीला तिचें हेंच नांव रूढ होतें असें दिसतें. श्रीशांतादुर्गा ही मूळची केळोशीची आणि तेथेंच रहाणारे तिचे उपासक होते. पुढें या देवतेचें स्थलान्तर झालें. काळाच्या ओघांत तिच्या उपासकांनाहि दूरदूरच्या ठिकाणीं रहावयास जावें लागून प्रत्यक्ष देवतेच्या सान्निध्याला ती मंडळी मुकली. तथापि त्यांच्या मनांतील आपल्या कुलदेवतेबद्दलचें प्रेम मात्र नाहींसें झालें नाही. त्यामुळें त्यांनीं आपल्याला नव्या रहात्या गांवींच कुलदेवतेच्या मूर्ति स्थापून देवळें उभारलीं. याचें एक उदाहरण म्हणून कुडाळ भागांतील तेंडोली गांवीं तेथील केळोशीकर मंडळींनीं स्थापिलेल्या श्रीशांतादुर्गा देवीचें सांगतां येईल. सांतेरी देवीचीं देवळें याप्रमाणेंच इतरहि कांहीं ठिकाणीं आढळतात. रत्नागिरी जिल्ह्यांतील (तालुका वेंगुर्लें) वेतारे या गांवीं असलेलें सांतेरी देवस्थान तर बरेंच प्रसिद्ध आहे. सर्पविष, पाल इत्यादींचें विष यांवर या देवीचें तीर्थस्नान व तेथील मातीचा लेप हीं हमखास गुणकारी आहेत. तसेंच त्वचारोगहि या देवीच्या तीर्थादिकांनीं बरे होतात अशी ख्याति आहे.

कवळ्याला श्रीशांतादुर्गा देवीमुळें महत्त्व आहेच; पण त्याशिवाय आणखीहि कांहीं उल्लेखनीय गोष्टी तेथें आहेत. एकतर स्मार्त सांप्रदायी गौड सारस्वतांचे गुरु गौडपादाचार्य यांचा मठ या गांवीं असून तो देवळापासून उजव्या बाजूला जवळच आहे. याशिवाय गांवांतील एक उंचवटा अति पुरातन स्थान म्हणून दाखविला जातो. आगापूर या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या वास्तूच्या ठिकाणीं पूर्वीं अगस्ति ऋषींचा आश्रम होता असें म्हणतात. मर्दनगड आणि भुयकोट हीं दोन ऐतिहासिक ठिकाणें येथें आहेत. पेशव्यांच्या अमदानींत मर्दनगड कांहीं काळ स्वराज्यांत होता. आज मात्र हीं ठिकाणें उद्ध्वस्त होऊन गेलेलीं दिसतात.

कवळ्याच्या फोंडें म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाड्यांत अंतरूज महालाच्या सरकारी कारभाराची मुख्य कचेरी होती. त्यावरूनच अंतरूजला फोंडें महाल हें नांव पडलें. फोंड्यापासून श्रीशांतादुर्गा देवस्थानाचें अंतर मैल सव्वा मैल इतकेंच असेल. फोंडें हें गोव्यांतील मोटारवाहतुकीचें केंद्र असून त्याहि दृष्टीनें त्याचें महत्त्व मोठें आहे.

असा हा श्रीशांतादुर्गेचा इतिहास आहे. क्रोधवश होऊन भांडणाऱ्या विष्णु-शंकरांचें भांडण जिनें मिटवून त्यांना शांत केलें त्या श्रीशांतादुर्गेपाशीं आपण प्रार्थना करूं या.

“ शांति माते सुतेजे भवभवभवनीं पोहतां हस्त हर्षें ॥
साहां ग्राहां ग्रहांच्या खरदरदरदीं राहवी हस्त हर्षें ॥
हा हा पाहा सहा ते स्मृतिकतिमतिला भासलें सत्य सद्य ॥
तारी तारी करीं घे सुरवरवरदे धांव हा वत्स वध्य ॥ १ ॥

श्रीशांतादुर्गा ही गोमंतकाची शांतिदेवता आहे तशीच ती त्याची शक्तिदेवताहि आहे. या शांतिदेवतेच्या कृपेनें गोमंतकीय बांधवांना शांतता लाभो आणि ती प्राप्त करून घेण्यासाठीं या शक्तिदेवतेच्या कृपाप्रसादानें त्यांना पुरेशी शक्तीहि प्राप्त व्हावो.

REFBK-0013664

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ-माला : संच ३ रा

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें


**गोमंतकाची शान्ति-शक्ति** ■ १३ ■
कवळयाची शांतादुर्गा : वा. ल. वझे

**पार्वतीपते ! हर हर महादेव** ■ १४ ■
गोमंतकाचा श्रीमंगेश : वा. ल. वझे

**' डाकिन्याम् भीमशंकरम् '** ■ १५ ■
भीमाशंकर क्षेत्र : शं. ना. जोशी

**दलितांचा कैवारी भार्गवराम** ■ १६ ■
कोंकणचें परशुराम क्षेत्र : स. आ. जोगळेकर

**छत्रपतींचें कुलदैवत** ■ १७ ■
शिखर शिंगणापूर : चिं. ग. कर्वे

**श्रीगुरूंचें गंधर्वपूर** ■ १८ ■
श्रीक्षेत्र गाणगापूर : रा. चिं. ढेरे


...अशीं आणखी किती तरी पुस्तकें आम्ही आपल्या हातीं दिलीं आहेत. त्यापैकीं वरील सहाचा हा तिसरा संच.

* * * * * * * * * * * * * * * *

**प्रत्येक पुस्तकाची किंमत ६२ नये पैसे**

**सहा पुस्तकांचा संच : रुपये ३–७२**

* * * * * * * * * * * * * * * *


**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.**
२, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २.

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : संच ३ रा

*महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें*


**गोमंतकाची शान्ति-शक्ति** ▪ १३ ▪
कवळ्याची शांतादुर्गा : वा. ल. वझे

**पार्वतीपते ! हर हर महादेव** ▪ १४ ▪
गोमंतकाचा श्रीमंगेश : वा. ल. वझे

**‘ डाकिन्याम् भीमशंकरम् ’** ▪ १५ ▪
भीमाशंकर क्षेत्र : शं. ना. जोशी

**दलितांचा कैवारी भार्गवराम** ▪ १६ ▪
कोंकणचें परशुराम क्षेत्र : स. आ. जोगळेकर

**छत्रपतींचें कुलदैवत** ▪ १७ ▪
शिखर शिंगणापूर : चिं. ग. कर्वे

**श्रीगुरूंचें गंधर्वपूर** ▪ १८ ▪
श्रीक्षेत्र गाणगापूर : रा. चिं. ढेरे


...अशीं आणखी किती तरी पुस्तकें आम्ही आपल्या हातीं दिलीं आहेत. त्यापैकीं वरील सहाचा हा तिसरा संच.

* * * * * * * * * * * * * * * *

**प्रत्येक पुस्तकाची किंमत ६२ नये पैसे**
**सहा पुस्तकांचा संच : रुपये ३–७२**

* * * * * * * * * * * * * * * *


**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.**
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २.